स.फौ.प्र.क्र. –२८२६/२०१७
सरकार वि. सत्यापाल हिवराळे
**निशाणी क्र.१६**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब</u>**
सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | **विनायक भाऊरावजी खंडारे, (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार )** |
| वय | – | ६७ वर्ष, धंदा – मजुरी, |
| राहणार | – | अंजनगाव बारी, ता. जि.अमरावती. |

-----------------------------------------

**<u>सरतपास सरकारतर्फे श्रीमती आर.जी. हाडे सरकारी वकील</u>**

(१) घटना ७–८ वर्षापुर्वी राजापेठ रोडवर सकाळी ०९.०० ते ०९.३० वाजताचे दरम्यान घडली होती. त्यावेळी मी ऑटोने डेपोला चालला होतो. माझ्या सोबत ऑटोमध्ये माझी पत्नी, माझा लहान भाऊ व त्याची पत्नी होती. एक दुसरा ऑटो आला, त्याने बाजुने आमच्या ऑटोला ठोस मारली. मी आणि दुसरा प्रवासी रामाजी पोफळे खाली पडलो. त्यामुळे माझ्या कमरेला व उजव्या पायाला मार लागला. पोफळे याला डोक्यावर आणि चेहऱ्यावर मार लागला होता. तेथे एक गाडी आली व आम्हाला इर्विन दवाखान्यात घेवून गेली. मी इर्विन दवाखाना येथे चार दिवस भरती होतो. मला पायाला एक महिन्याचे प्लॅस्टर होते. पोलीस तेथे आले होते. विचारपुस केली होती. पडलो हे मी पोलीसांना सांगितले, कोणी पाडले, हे सांगितले नाही. पोलीसांनी लिहून घेतले होते. पोलीसांनी माझा अंगठा घेतला होता. आता साक्षीदारास <u>बयान</u> दाखविण्यात आले. त्याखाली माझा अंगठा आहे. पोलीसांनी मी सांगितल्याप्रमाणे मजकुर लिहून घेतला होता. (आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस.एस. थोरात यांनी आक्षेप नोंदविला की, फिर्यादीला निशाणी पडलेले असून

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030046642017-orderno-2.pdf
www.ecourtsindia.com

प्रस्तुतच्या साक्षीदाराच्या बयाणाला निशाणी देता येत नाही. विद्वान सरकारी वकिल यांनी युक्तीवाद केला की, साक्षीदार कडून प्रथम खबर मिळाली, त्यामुळे प्रस्तुतचे बयान हे फौजदारी प्रकिया संहिता कलम १६१ प्रमाणे नाही. ऐकले, प्रस्तुत साक्षीदाराचे बयाण दवाखान्यात दाखल असतांना नोंदविण्यात आलेले असून त्यावर डॉक्टरांचा शेरा, साक्षीदाराची सही व बयाण नोंदविणाऱ्याची सही आहे. त्यामुळे सदरचे बयाण फौजदारी प्रकिया संहिता कलम ३२ नुसार नोंदविल्याचे दिसून येत असून, त्यास निशाणी देण्यात येत नाही.)

**सरतपास संपला**

**उलटतपास आरोपी तर्फे श्री. श्री. एस.एस. थोरात विधीज्ञ यांचे मार्फत.**

**उलटतपास नाकारला.**

फेरतपास नाही.

सा.वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्विकृत

**(अ. भा. कट्टे)**
दिनांक : १७.०८.२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र.१०, अमरावती.

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030046642017-orderno-2.pdf

www.ecourtsindia.com